महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळ,
(पुनरावृत्ती) पुनर्रचना करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : दर्शनि-२०२०/प्र.क्र.७०/सां.का.२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ डिसेंबर, २०२२

**वाचा :** १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दर्शनि-२०१८/प्र.क्र.१३७/सांका.२, दि.१९ नोव्हेंबर,२०१८.
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दर्शनि-२०२०/प्र.क्र.१६/सां.का.२, दि. २१ जानेवारी,२०२०.
३. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक १११८, दि.११.११.२०२२.

**प्रस्तावना :-**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भ क्रमांक १ येथील दि. १९ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळाची पुनर्रचना करण्यात आली होती. या संपादक मंडळाची मुदत उक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ वर्षे किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत होती. संदर्भ क्रमांक २ नुसार या मंडळावरील सर्व अशासकीय व स्वीकृत सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या होत्या. सबब, महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळाची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता.

**शासन निर्णय :-**

आता महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळाची पुनर्रचना करुन त्यावर खालील अध्यक्ष व सदस्यांची या आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव/सचिव सांस्कृतिक कार्य (मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे संबधित सचिव) | पदसिद्ध अध्यक्ष |
| २. | कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग | सदस्य सचिव |
| ३. | डॉ.गो.ब.देगलूरकर | अशासकीय सदस्य |
| ४. | डॉ. साईली पलांडे | अशासकीय सदस्य |
| ५. | डॉ.प्रदीप आपटे | अशासकीय सदस्य |
| ६. | डॉ. सुरेश गरसोळे | अशासकीय सदस्य |
| ७. | डॉ. पृथ्वीराज तौर | अशासकीय सदस्य |
| ८. | डॉ. गिरीष मांडके | अशासकीय सदस्य |
| ९. | डॉ.श्रीराम येरणकर | अशासकीय सदस्य |
| १०. | डॉ. श्रध्दा कुंभोजकर | अशासकीय सदस्य |
| ११. | डॉ.मंजिरी भालेराव | अशासकीय सदस्य |
| १२. | डॉ. अंबरीश खरे | अशासकीय सदस्य |
| १३. | डॉ. ग.का.माने | अशासकीय सदस्य |
| १४. | डॉ. जयकुमार मगर | अशासकीय सदस्य |
| १५. | श्री. अशोकसिंह ठाकूर | अशासकीय सदस्य |
| १६. | श्री. जयंत मृग | अशासकीय सदस्य |
| १७. | श्री. प्रदिप लोखंडे | अशासकीय सदस्य |

तसेच डॉ.जी.ए.बुवा यांची सिंधुदुर्ग जिल्हा गॅझेटिअर, डॉ. हरिभाऊ क्षीरसागर यांची वाशीम जिल्हा गॅझेटिअर, श्री. गिरीश सदाशिव टकले यांची नाशिक जिल्हा गॅझेटिअर व डॉ. सर्जेराव जयंवतराव भामरे यांची नंदूरबार जिल्हा गॅझेटिअरसाठी स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या संपादक मंडळाच्या अशासकीय सदस्यांना अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता, दैनिकभत्ता शासन निर्णय, वित्त विभाग क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५,दिनांक ३.३.२०१० व बैठकभत्ता शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. बैठक-२०१०/प्र.क्र.१/सेवा-५, दिनांक.२४.०५.२०१२ अन्वये मंजूर करण्यात यावा. मात्र या अशासकीय सदस्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. प्रवासभत्ता, दैनिकभत्ता यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करेल ते या संवादक मंडळाच्या अशासकीय सदस्यांना लागू राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१२०८११४२२११३२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUMANT DINKAR PASHTE

Digitally signed by SUMANT DINKAR PASHTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=58694d4cd2bd16f0ab6514fc8598a9aa217e2508455856a701adb1bb6ef9b120, pseudonym=565ADED7321B71A5B0327BA1F7149AED1F618E4E, serialNumber=AFC006DAAE95D0F2CF7C7F09CA18CF0C9C9363A05E6070B1C03455CF1CB43586, cn=SUMANT DINKAR PASHTE
Date: 2022.12.08 11:44:35 +05'30'

**( सु. दि. पाष्टे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई.
५. मंडळाचे सर्व सदस्य व स्विकृत सदस्य (कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई यांचे मार्फत)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय-१४/सेवा-५) मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती-सां.का.२.